# प्रकरण - ८

## प्रकरण ५

# विकासात्मक महामंडळाचे दुर्बल घटकांसाठी योगदान

प्रस्तुत प्रकरणात काही लाभधारकांच्या मुलाखती घेवून त्यांची लाभपूर्व आर्थिक परिस्थिती आणि शासनाच्या विकासात्मक महामंडळाचा लाभ घेतल्यानंतरची आर्थिक परिस्थिती, तसेच लाभ मिळविण्यासाठी लाभार्थींना आलेल्या अडीअडचणीबाबतचे विश्लेषण या प्रकरणात केले आहे.

विसावे शतक हे महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासनाच्या उपक्रमाद्वारे समाजात नवचैतन्य आणि प्रबोधन घडवून आणणारे शतक ठरले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासनाच्या उपक्रमांचे अनेक पैलू आहेत. विशेष घटक योजना, वीस कलमी कार्यक्रम योजना, जिल्हा परिषद वीस टक्के राखीव निधीतील योजना, छत्रपती राजर्षी शाहू महाराज पुरस्कार योजना आणि प्रत्येक जाती जमातीच्या कल्याणासाठी स्वतंत्र शासकीय विकास महामंडळ इत्यादी कार्यक्रम व यंत्रणांची उभारणी केलेली आहे.

अनुसूचित जाती जमातीकरीता स्वतंत्र अशा शासकीय महामंडळाची निर्मिती करण्यात येईपर्यंत म्हणजेच सन १९७८ पूर्वीचा सुमारे ५० ते ७५ वर्षाचा काळ हा अस्पृश्याकरिता कठीण जीवन जगण्याचा काळ होता. जन्मत: निसर्गाने सारख्या निर्मिलेल्या माणसामध्ये मात्र माणसानेच दुही निर्माण केली.

मानवताहीन, कलंकीत आणि मृतवत जीवन जगत असणा-या या अस्पृश्यांना आपलेही काही स्वत:चे हक्क आहेत, अधिकार आहेत आणि मानव म्हणून आपल्यालाही आपल्या काही किमान गरजा पूर्ण करून घेता येतात याची जाणीव निर्माण करून देणारे समाजसुधारक आणि दलितोध्दारक हे निर्माण झाले. सवर्ण वरिष्ठाप्रमाणेच आपणही हक्काचे उपभोक्ते आहोत याची काही अंशी का असेना पण जाणीव ही ह्या समाजामध्ये निर्माण झाली. याचाच पाठपुरावा हा समाजामध्ये सतत करण्याचा प्रयत्न केला गेला.

समाजातील मूठभर सधन, सुशिक्षित व सुस्थितीतील जीवन जगणारा समाज वगळता उर्वरित समाज मात्र दुर्बल, कमकुवत व दारिद्र्यरेषेअंतर्गत जीवन जगत होता. या समाजाजवळ उदरनिर्वाहासाठी शेतीसारखे ठोस साधन तर उपलब्ध नव्हतेच तर मोलमजुरी हेच त्यांच्या उत्पन्नाचे साधन बनले होते. किमान शिक्षण, बेरोजगारी अशा दैनंदिन समस्या ह्या त्यांच्या जीवनाचा एक भाग बनल्या होत्या.

अशा या लोकसमुदायाला व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी आवश्यक असलेले भांडवल, व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षण यांचा अभाव ह्या त्यांच्या विकासमार्गाच्या पायातील शृंखला बनल्या होत्या. या जाणिवेतूनच शासनाने सामाजिक न्याय विभागातंर्गत महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव विकासात्मक महांडळाची स्थापना केली. कार्याच्या सुलभतेसाठी जिल्हयातही त्यांच्या शाखा निर्माण केल्या. जिल्हयातील या विकासात्मक महामंडळानी किती लाभधारकांना आर्थिक लाभ मिळवून देण्याच्यादृष्टीने यशस्वी वाटचाल केली आहे याचा आढावा साधारणत: पुढीलप्रमाणे घेता येईल.[१]

**१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ**

अनुसूचित जाती जमातीतील लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस मदत करणारे हे महामंडळ आजतागायत जिल्हयातील अनेक लाभधारकांना विविध योजनांतर्गत स्वयंरोजगार व त्या अनुषंगाने शिक्षण-प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे एक महत्त्वपूर्ण असे केंद्र बनले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बीज भांडवल | : | १६६७ |
| २. | ५० टक्के अनुदान योजना | : | २८१६५ |
| ३. | प्रशिक्षण योजना | : | ५२२ |
| ४. | एन. एस. एफ. डी. सी. योजना | : | १६० |
| ५. | सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी पुनर्वसन योजना | | |
| | अ) पुनर्वसन योजना | : | ३६२ |
| | ब) प्रशिक्षण योजना | : | ३३४ |
| | क) एन. एस. के. एफ. डी. सी. योजना | : | ५ |

अशा एकंदरीत जिल्हयातील ८५६ लाभधारक विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचे तर ३०,३५९ लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीसाठी अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावून त्यांची कुटुंबे सावरण्याचे, आर्थिकदृष्ट्या सबळ, सक्षम पायावर त्यांचे जीवन उभारणीचे काम हे महामंडळाने केले आहे आणि आजही ते करीत आहेत.[२]

## २. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जामती विकास महामंडळ

विमुक्त जाती व भटक्या जामतीतील लोकसमुदायाला उन्नतीच्या दिशेने नेणारे, ह्या जिल्हयातील विकासात्मक महामंडळाने आजतागायत ११४७ लाभधारकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला आहे.[३]

## ३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ

अनुसूचित जातीमध्ये बहुसंख्येने समाविष्ट असलेल्या मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारकांना, समाजामध्ये स्वत:चे अस्तित्व, ओळख निर्माण करण्यास ह्या विकासात्मक महामंडळाने विविध कल्याणकारी योजनांच्या आधारे मदत केली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनुदान योजना | : | ५३३७ |
| २. | बीज भांडवल योजना | : | १९६ |
| ३. | मुदती कर्ज | : | ८० |
| ४. | लघुऋण योजना | : | २२ |

आजतागायत महामंडळाने जिल्हयातील एकूण ५६३५ लाभधारकांच्या स्वयंरोजगार उभारणीस अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावून त्यांच्या दैनंदिन उदरनिर्वाहाच्या प्रश्नाची सोडवणूक तर केलीच शिवाय जिल्हयातील प्रत्येक वर्षी पाच लाभधारक विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्त्या देवून त्यांच्या शैक्षणिक वाढीस प्रोत्साहन दिले. तर ८३० लाभधारक प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण हे महामंडळाने देवू केले आहे.[४]

## ४. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ

विकासात्मक महामंडळाने आजतागायत (१९९९-२००० ते २००५-०६) जिल्हयातील ११८ लाभधारकांच्या स्वयंरोजगार उभारणीस आणि समृध्दीच्या दिशेने त्यांच्या जीवनाची वाटचाल घडवून आणण्यास, तर ३५ लाभधारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासास हातभार लावण्यास मदत केली. एका स्वयंसेवी संस्थेस (२५ लाभधारकांना) आणि एका स्वयंसहाय्यता बचत गटासही विकासात्मक महामंडळाने अर्थसहाय्य उपलब्ध करून देवून लाभधारक व्यक्तीचे जीवन सावरण्याची, त्यांच्या जीवनाला एक वेगळी कलाटणी देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी ह्या विकासात्मक महामंडळाने केले आहे.

उपरोक्त विकासात्मक महामंडळे ही जिल्हयातील दुर्बल घटकाकरिता महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडीत आहेत. यामध्ये महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचाही समावेश आहे. परंतु या विकासात्मक महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय जिल्हयात कार्यरत नसल्याने लाभधारकांना ते अडचणीचे व गैरसोयीचे ठरत आहे. प्रसंगी त्यांना या लाभावाचून वंचित राहावे लागत आहे.

वरील विकासात्मक महामंडळांच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्हयातील अनेक लाभधारकांनी घेतला आहे. त्यापैकी काही लाभधारकांच्या मुलाखती घेण्याचा प्रयत्न केला. सदर मुलाखती ह्या पुढीलप्रमाणे विशद करता येतील.[५]

### १. महामंडळाचे नाव : महात्मा फुलें मागासवर्ग विकास महामंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. अरविंद रामा कर्णिक |
| पत्ता | : | रा. तामगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३२ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | एन. एस. एफ. डी. सी. योजना |
| एकूण रक्कम | : | रु. ४,३४,०००/- |
| लाभधारकाचा हिस्सा | : | रु. २४,०००/- |
| अनुदानाची रक्कम | : | रु. १०,०००/- |

एन. एस. एफ. डी. सी. रक्कम : रु. ३,००,०००/-

महामंडळाचे कर्ज : रु. १,००,०००/-

लाभपूर्व परिस्थिती : अत्यंत बिकट, पूर्ण गरिबीची

लाभधारक पूर्वी बिल्डींग पेंटींग मजुरीचे काम करीत होते. परंतु त्यामध्ये त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा खर्च भागत नव्हता. कारण पेंटींग काम हे त्यांना नेहमी मिळत नव्हते. त्यामुळे आर्थिक अडचण ही त्यांना कायमस्वरूपी भासत होती. शिवाय शिक्षण कमी असल्यामुळे नोकरी मिळत नव्हती. तर व्यवसायासाठी आवश्यक असलेले भांडवल त्यांच्याजवळ नव्हते.

अशावेळी त्यांना महामंडळाच्या योजनासंदर्भात माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी "मालवाहतूक जीप" या व्यवसायासंबंधीचे कर्ज प्रकरण महामंडळाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाने थेट कर्ज योजनेअंतर्गत प्रस्ताव मंजुरीस दिला. वर्षभरातच त्यावर कार्यवाही होऊन त्यांचे कर्ज प्रकरण मंजूर होवून त्यांना वाहनाचे वितरण करण्यात आले.

आज ते सदरचे वाहन सुरेश आणि कंपनी यांच्या मसाले व लोणची, तर पदार्थ ठोक विक्रीकरीता वापरत आहेत. आणि त्यातून येणा-या उत्पन्नातून ते महामंडळाचे नियमित हप्ते भरून आपल्या कुटुंबाची जबाबदारी अगदी योग्यरित्या सांभाळीत आहेत. या व्यवसायात ते पूर्णपणे समाधानी आहेत.

लाभधारकाचे नांव : श्री. राहुल छगन भुजबळ

पत्ता : रा.रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

वय : अंदाजे ३२ वर्षे

योजनेचे नांव : : एन. एस. एफ. डी. सी. योजना

लाभाचे स्वरूप : ट्रॅक्स वाहन

एकूण रक्कम : रु. ४,५०,०००/-

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचा हिस्सा | : | रु. ४०,०००/- |
| अनुदानाची रक्कम | : | रु. १०,०००/- |
| एन. एस. एफ. डी. सी. रक्कम | : | रु. ३,००,०००/- |
| महामंडळाचे कर्ज | : | रु. १,००,०००/- |
| लाभपूर्व परिस्थिती | : | अत्यंत बिकट, पूर्ण गरिबीची |

लाभधारक हे पूर्वी रूकडी आणि इचलकरंजी या गावातील खाजगी कंपनीत व दुकानात कामगार म्हणून काम करीत होते. महिन्याकाठी १२०० ते १५०० रुपये मिळत होते. पण त्यातून घरखर्च भागत नव्हता. त्यामुळे कधीकधी गाड्यावर ड्रायव्हर म्हणून काम करीत असत. परंतु कंपनीतील काम आणि ड्रायव्हींग यांचा ताळमेळ बसत नसे. म्हणून मग महामंडळाच्या योजनेबाबतची माहिती घेऊन "ट्रॅक्स वाहन" या व्यवसायासंबंधीचे कर्ज प्रकरण महामंडळाकडे सादर केले. अंदाजे वर्षभरातच त्यावर कार्यवाही होऊन ट्रॅक्स वाहनाचे वितरण त्यांना करण्यात आले.

सध्या ते वाहन गावातील व जवळपासच्या गावातील लोकांच्या मागणीनुसार प्रतिकिलोमीटर प्रमाणे पैशाची आकारणी करून प्रवास, लग्नकार्य आणि अन्य बाबीसाठी वापरतात. यातून स्वतःच्या मालकीचे एक वाहन तयार झालेच शिवाय वाहनाचा देखभाल खर्च व तेलाचा खर्च वगळता आज थोडीफार रक्कमही शिल्लक राहते आहे. त्यामुळे ते त्यांच्या कुटुंबाचा सांभाळ पूर्वीपेक्षा चांगल्याप्रकारे करू शकतात.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. प्रकाश दत्तात्रय भोसले |
| पत्ता | : | रा.रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३१ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | ५० टक्के अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | संगणक खरेदी |
| एकूण रक्कम | : | रु. ३०,०००/- |

बँक कर्ज : रु. २०,०००/-

अनुदानाची रक्कम : रु. १०,०००/-

पदवीधर असूनही मनाप्रमाणे नोकरी नव्हती. म्हणून मग सध्या मागणी असलेला संगणकाचा बेसिक, डी. टी. पो. आणि टॅली यांचा कोर्स करण्याचे निश्चित केले. टंकलेखनाचे ज्ञान असल्याने संगणक प्रशिक्षण घेण्याचे निश्चित केले होते. तेव्हा या महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेविषयीची माहिती मिळाली आणि त्यानुसार कोल्हापूरच्या अभिनव टेक्निकल इन्स्टिटयूशनमध्ये सहा महिन्याचे संगणक प्रशिक्षण घेतले. त्यातून संगणकाचे पायाभूत बेसिक, डी. टी. पी. यांचे प्रशिक्षण मिळाले.

त्यानंतर सहा महिने त्यांनी ह्या त्या इन्स्टिटयूशनमध्ये काम केले. परंतु प्रवास खर्च आणि ८ ते १० तासाचे काम, त्यामानाने उत्पन्न मिळत नव्हते. म्हणून मग पुन्हा महामंडळाची मदत घेतली.

महामंडळाच्या सहकार्याने गेल्यावर्षी एक संगणक घेतला आणि त्याद्वारे आज कोर्टाची कामे, यंत्रमागधारकांच्या हिशोबाची कामे, शाळा, क्लास यांच्या प्रश्नपत्रिकेसंबंधीची कामे याशिवाय लहान संस्था, कंपन्या यांच्या हिशोबाची कामे ते करीत आहेत. शिवाय संध्याकाळी दोन मुलांना संगणक प्रशिक्षण देण्याचे कामही ते करतात. त्यातून त्यांना ब-यापैकी मिळकत होत आहे.

महामंडळाच्या या योजना खरोखरच आम्हा बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी आहे. केवळ पदवीधर असून मनाप्रमाणे चांगली नोकरी मिळणार नाही. शासकीय नोक-या तर आता आमच्यासारख्या सामान्याकरीता अशक्य असल्याने, स्वावलंबी जीवन जगण्याचा एक चांगला मार्ग ह्या महामंडळामुळे आम्हाला मिळतो आहे. खरेच ही अत्यंत समाजोपयागी बाब आहे. ह्या महामंडळामुळे काही अंशी का असेना बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. महामंडळाच्या प्रयत्नामुळेच मी आज हे करू शकलो असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. राजेंद्र संभाजी कांबळे |
| पत्ता | : | रा. चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३३ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | ५० टक्के अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | सायकल दुकान |
| एकूण रक्कम | : | रु. २०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| अनुदानाची रक्कम | : | रु. १०,०००/- |

घरातीलच समोरच्या खोलीत सायकल पंक्चर काढणे, ब्रेक आवळणे, औट काढणे इत्यादी स्वरूपाची किरकोळ कामे करीत होते. त्यातून दिवसाकाठी ६० ते ७० रुपये मिळकत होत होती. परंतु त्याच व्यवसायात वाढ केल्यास अधिक उत्पन्न मिळेल म्हणून मग महामंडळाच्या अधिका-यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार ५० टक्के अनुदान योजनेनुसार "सायकल दुकान" या व्यवसायासाठी अर्ज केला.

काही महिन्याच्या अंतराने गावातील युनायटेड वेस्टर्न बँकेकडून रु. २०,०००/- चा चेक मिळाला. त्यातून दुकानासाठी आवश्यक असे साहित्य खरेदी केले. त्यामुळे आता ते दुकानात सायकलचे सर्व भाग दुरूस्त करून देण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या दिवसाकाठीच्या मिळकतीत वाढ झाली आहे आणि व्यवसायातही चांगला जम बसला आहे. येणा-या उत्पन्नातून महामंडळाचे हप्तेही भरता येत आहेत. आपल्याप्रमाणेच कुटुंबातील आपल्या भावाला त्यांच्याजवळ असलेल्या वाहनचालकाच्या परवान्यामुळे मोठ्या रक्कमेच्या व कमी व्याजदराच्या एन. एस. एफ. डी. सी. च्या योजनेचा लाभ घेण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. परंतु ह्या प्रक्रिया अत्यंत किचकट व विलंबाच्या वाटत आहेत. काहीकाही वेळेला तर प्रलंबित अर्ज व अन्य त्रुटी यामुळे योजनेचा लाभ हा मिळत नाही. म्हणून ते म्हणतात की, जिल्हयातील विकासात्मक

म्हामंडळामार्फत राज्यशासनाने एन. एस. एफ. डी. सी. यासारख्या कल्याणकारी योजना राबवाव्यात.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | सौ. मनिषा नाना कांबळे |
| पत्ता | : | रा. रांगोळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३३ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | ५० टक्के अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | म्हैस पालन (डेअरी) |
| एकूण रक्कम | : | रु. २०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| अनुदानाची रक्कम | : | रु. १०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | घरकाम |

घरखर्च, घरातील वडिलधा-यांचे आजारपण, मुलांचा खर्च हे सर्व केवळ एकट्याच्या पगारावर भागतच नव्हते. त्यामुळे त्यांना आर्थिक चणचण सतत भासत होती. म्हणून मग काहीतरी केले पाहिजे यासाठी घरबसल्या करता येणा-या म्हैसपालनाच्या व्यवसायाची निवड केली. आणि म्हैसपालन या व्यवसायातंर्गत महामंडळाकडे अर्ज केला.

त्यानुसार त्यांच्या गावातीलच रत्नाकर बँकेतून रु. २०,०००/- इतके कर्ज मिळाले. त्यातून त्यांनी म्हैस घेतली. त्यामुळे ३ ते ४ लिटर दूध त्यांना प्रतिदिन मिळत आहे. त्यातून त्यांचा घरखर्च तर भागतोच शिवाय डेअरीत काही दूध ते घालतात. त्यामुळे हाती चार पैसे येत आहेत व किरकोळ घरखर्च भागवण्यास त्यांना मदत होत आहे.

महामंडळ त्यांना कर्ज देते, त्यांची मदत करते. पण महामंडळाने महिलांकरीता विशेष योजना राबवावी आणि घरगुती शिवण, टिपण, भरतकाम, अंगणवाडी प्रशिक्षण, इमिटेशन ज्वेलरी मेकिंग, नीळ, साबण बनविणे इत्यादीचे प्रशिक्षण वर्ग भरवावेत आणि

व्यवसाय उभारणीस मदत म्हणून शिवणयंत्र, शेवया बनविण्याचे यंत्र, पिको-फॉल मशिन हे कमी किंमतीत उपलब्ध करून दयावीत. म्हणजेच त्यांना घरगुती व्यवसाय करता येतील आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनता येईल असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. जर्नादन केशव कांबळे |
| पत्ता | : | रा. शिरदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३५ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | ५० टक्के अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | कापड दुकान |
| एकूण रक्कम | : | रु. २०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| अनुदानाची रक्कम | : | रु. १०,०००/- |

लाभधारक पूर्वी इचलकरंजीतील ॲटोलूम्सवर काम करीत होते. पगार चांगला होता पण रात्रीचे काम असल्याने तब्येतीची तक्रार सतत जाणवत होती. शिवाय दररोज प्रवासखर्च, मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न यासाठी झालेला खर्च यामुळे अलिकडे आर्थिक ओढाताण अधिक जाणवत होती. मर्यादित पगारावर भागत नव्हते. म्हणून मग स्वतःचा व्यवसाय करण्याचे निश्चित केले. आणि त्यानुसार महामंडळाकडे "कापड दुकान" या व्यवसायासाठी अर्ज केला.

महामंडळाने केलेल्या सहकार्याने गावातील सांगली बँकेकडून रु. २०,०००/- चे कर्ज घेतले. त्यातून रेडिमेंड कापड खरेदी केली. व्यवसायालाही ब-यापैकी मागणी आहे. परंतु महामंडळाच्या अल्प मदतीमुळे रेडिमेड कापडामध्ये जितक्या प्रमाणात व्हरायटी आवश्यक होत्या तितक्या प्रमाणात ग्राहकांना देता येत नाही. हीच अडचण अजून त्यांच्यासमोर आहे. त्यामुळे त्यांना वाटते की, महामंडळाने अशा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसायांना मोठ्या रक्कमेचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दयावे. म्हणजे

त्यांना अन्य इतरत्र कर्ज काढावे लागणार नाही तर महामंडळाच्या अर्थसहाय्यातून व्यवसाय उभा करता येईल.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. बाळु चंद्राप्पा कांबळे |
| पत्ता | : | रा. साजणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३४ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | ५० टक्के अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | डेअरी |
| एकूण रक्कम | : | रु. २४,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १४,०००/- |
| अनुदानाची रक्कम | : | रु. १०,०००/- |

गावापासूनच जवळच्या महालक्ष्मी इंडस्ट्रीजमध्ये ते काम करतात आणि थोडी जमीन आहे. परंतु बेभरवशाची नोकरी, पत्नीचे आजारपण, मुलांचे शिक्षण यास्तव भारी रक्कम खर्च होते. अशावेळी काहीतरी केल्याशिवाय उत्पन्न मिळणार नाही. तर कर्ज व व्याजाच्या चक्रात अडकून पडू म्हणून मग महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्याचे निश्चित केले. "डेअरी व्यवसाय" साठी महामंडळाकडे अर्ज केला.

काही महिन्यांनी के. डी. सी. सी. बँकेतून रु. २४,०००/- चा चेक मिळाला आणि 'जर्सी' या जातीच्या गाईंची खरेदी केली. यामुळे घरखर्च भागून काही दूध ते डेअरीला घालतात. घरची थोडी वैरण मिळत असल्याने ते त्यांना बरे पडते. परंतु गायीसाठी आवश्यक पेंड, औषधपाणी यांचा खर्च वगळता महिन्याला काही रक्कम हाती मिळते. त्यामुळे पूर्वीच्या परिस्थितीत थोडा बदल झाला आहे. बँकेचे हप्तेही भरता येत आहेत.

महामंडळाची ही योजना अनुदान असल्याने किफायतशीर आहे. शिवाय बँक कर्जावरील व्याजदरही कमी आहे. त्यामुळे दुर्बल घटकाकरीता ही योजना फायद्याची ठरत आहे असे त्यांना वाटते.

## २. महामंडळाचे नांव : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. शिवाजी रावसो धनगर |
| पत्ता | : | रा. टाकवडे, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३३ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल कर्ज योजना |
| लाभाचे स्वरूप | : | शेळीपालन |
| एकूण कर्ज | : | रु. ३५,०००/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. ८,७५०/- |
| बँक कर्ज | : | रु. २६,२५०/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | शेतमजुरी |

शेतमजूर म्हणून काम करीत होते. त्या मिळकतीवरच कुटुंब चालवत होते. तेव्हा महामंडळाच्या योजनेविषयी माहिती मिळाली. शेतमजुरीला पूरक व्यवसाय म्हणून "शेळीपालन" या व्यवसायासाठीचे कर्ज प्रकरण महामंडळाकडे सादर केले.

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक जातीचा, उत्पन्नाचा दाखला मिळविण्यास अनेक अडचणी आल्या. नंतर सात-आठ महिन्याच्या कालावधीने गावातील बँकेकडून रु. ३५,०००/- चा चेक मिळाला. त्यातून १५ शेळ्या खरेदी केल्या आणि शेतमजुरीला पूरक व्यवसाय सुरू केला. यामुळे त्यांना मजुरीशिवाय आणखीन एक मिळकतीचे साधन मिळाले आहे.

परंतु बँकेकडून अधिक (७५ टक्के) रक्कमेचे, महामंडळाकडून कमी (२५ टक्के) रक्कमेची मदत त्यांना मिळते. यापैकी बरीच रक्कम योजनेचा लाभ घेण्यासाठी खर्च होते. शिवाय घेतलेल्या शेळ्यमधील एखादी दुसरी शेळी दगावल्यास त्यांना पुन्हा आर्थिक फटका बसतो. म्हणून त्यांना असे वाटते की, इतर महामंडळाप्रमाणेच ह्याही महानंडळाकडून लाभधारकांना अनुदान मिळावे. आणि महामंडळाच्या २५ टक्के या कर्ज

रक्कमेत वाढ होऊन ५० टक्के रक्कमेचे कर्ज हे लाभधारकांना उपलब्ध व्हावे. म्हणजेच लाभधारकांच्या दृष्टीने ते अधिक फायद्याचे ठरेल असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्रीमती शालन भरत वड्ड |
| पत्ता | : | रा. हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३६ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | भाजी विक्री |
| एकूण रक्कम | : | रु. १०,०००/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. २,५००/- |
| बँक कर्ज | : | रु. ७,५००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | घरकाम |

इतरांप्रमाणे ह्याही घरकाम करीत होत्या. पती खाजगी कंपनीत नोकरी करीत आहेत. त्यांच्या पगारावर घरखर्च भागत नव्हता. त्यामुळे सतत उसनवार ही करावी लागत होती. म्हणून व्यवसाय करण्याचे निश्चित करून महामंडळाकडे "भाजी विक्री" या व्यवसायासाठीचे कर्ज प्रकरण सादर केले.

जिल्हयातील बँकेकडून रु. १०,०००/- चा चेक मिळाला. त्यामुळे आता त्या शेतक-यांकडून घाऊक स्वरूपात भाज्या विकत घेवून त्या बाजारात विकतात. त्यातून काही वेळा ब-यापैकी मिळकत होते तर काही वेळा भाज्या खराबही होतात. आणि आर्थिक फटकाही सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांचा हा व्यवसायही त्यांना बेभरवशाचा वाटतो. शिवाय हप्तेही भरावे लागतात. यामध्ये बँक कर्ज अधिक व्याजदराचे आहे आणि कमी व्याजदराची रक्कम महामंडळाची आहे. पण तरी बाहेरच्या सावकारी कर्जापेक्षा ही आर्थिक मदत चांगली आहे. सरकारने अशा या दुर्बल घटकांसाठी आणखीन काही योजना राबवाव्यात किंवा त्यांच्या मालकीचा जमिनीचा तुकडा हा त्यांना अल्प रक्कमेत उपलब्ध करुन दयावा. म्हणजेच स्वतःच्या मालकीचे,

स्वकष्टावर पोट भरण्याचे एक उत्पन्नाचे साधन उपलबध होईल असे त्यांचे म्हणणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. मारुती दुर्गाप्पा वाजंत्री |
| पत्ता | : | रा. लिंगनूर, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३३ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | शिलाई मशिन (टेलरिंग शॉप) |
| एकूण रक्कम | : | रु. ३५,०००/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. ८,७५०/- |
| बँक कर्ज | : | रु. २५,२५०/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | |

किमान शिक्षण असल्याने चांगली नोकरी मिळाली नाही. घरगुती स्वरूपात पुरुषांची कपडे शिवुन दयायचे. कारण त्यांच्याजवळ प्रशिक्षण होते पण व्यवसायासाठी आवश्यक भांडवल नव्हते. महामंडळाविषयीची माहिती त्यांना मिळाली. मग त्यांनी व्यवसाय करण्याचे निश्चित करून महामंडळाकडे "टेलरिंग शॉप" या व्यवसायातंर्गत कर्ज प्रकरण सादर केले.

साधारणत: वर्षभराच्या कालावधीने त्यांचे कर्ज प्रकरण मंजूर होऊन त्यांना गावातील बँकेतून रु. ३५,०००/- चा चेक मिळाला. यामुळे त्यांनी गावात स्वतंत्र गाळा भाड्याने घेऊन ओव्हरलॉकचे मशिन खरेदी करून व्यवसायास सुरुवात केली. त्यामुळे आता त्यांची कमाई पूर्वीपेक्षा अधिक होत आहे. शिवाय आज त्यांच्याकडे एक कामगारही काम करतो आहे. ते म्हणतात, महामंडळाने बेराजगारांना आणि प्रशिक्षणधारकांनाही एक चांगली संधी उपलबध करून दिली आहे. पण लाभधारकांना त्यातही पुन्हा अडचणी जाणवतात. ते म्हणाले, समाजातील इतर स्तरातील उच्चवर्णीय लोकांनी गावातील मध्यवर्ती ठिकाणी व्यवसाय सुरू केलेला असतो. तेव्हा

त्यांच्यासारख्या लाभधारकांना मध्यवर्ती ठिकाणी व्यवसाय सुरु करता येत नाही. त्याचा व्यवसायावर खूपच परिणाम होतो. म्हणून त्यांना वाटते की, शासनाने गावातील ग्रामपंचायतीच्या मदतीने लाभधारकांना मध्यवर्ती अथवा बाजारपेठेच्या ठिकाणी गाळे हे उपलब्ध करून दयावेत. म्हणजे शासन करीत असलेली ही मदत यशस्वी होण्यास हातभार लागेल.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. राजाराम बाळू सणगर |
| पत्ता | : | रा. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३५ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | दुग्ध व्यवसाय |
| एकूण रक्कम | : | रु. ३५,०००/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. ८,७५०/- |
| बँक कर्ज | : | रु. २६,२५०/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | शेतमजुरी |

शेतमजुरी आणि त्या शेतातल्या वैरणीवर दोन शेळ्या पाळून जेमतेम हे कुटुंब चालवित होते. पण आजचे महागाईचे दिवस पाहता ते परवडणारे नाही. तेव्हा काहीतरी केले पाहिजे म्हणून महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्याचे ठरविले आणि "दुग्ध व्यवसाय" यासाठीचे कर्ज प्रकरण महामंडळाकडे सादर केले.

जवळच्या गावातील बँकेकडून रु. ३५,०००/- चा चेक मिळाला आणि त्यामधून आहे त्याच शेळ्यामध्ये आणखीन दोन शेळ्यांची वाढ केली, शिवाय दोन म्हैशीही घेतल्या. त्यामुळे आता दररोज ७ ते ८ लिटर दूध मिळत आहे. या दुधामुळे घरचा खर्च भागून काही पैसे मिळत आहेत. घरच्यांचीही या कामी मदत होत असल्याने पूर्वीचे शेतमजुरीचे कामही ते करीत आहेत. त्यामुळे पूर्वीपेक्षा आर्थिकदृष्ट्या त्यांचा अधिक जम बसला आहे. पण ते म्हणतात की, महामंडळाकडून त्यांना जी रक्कम मिळते त्यापैकी

बरीच रक्कम ही त्यांना लाभ घेण्यास खर्च करावी लागते. यासाठी महामंडळाने अनुदान म्हणून काही रक्कम उपलब्ध करुन दिली असती तर बरे झाले असते. आणि व्यवसाय उभारणीस खरोखरच महामंडळाची मदत झाली असती असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. अर्जून हिंदुराव गावडे |
| पत्ता | : | रा. घुणकी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३४ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | ॲटो रिक्षा (वाहन) |
| एकूण रक्कम | : | रु. ८७,२९६/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. २१,८२४/- |
| बँक कर्ज | : | रु. ६५,४७२/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | इलेक्ट्रीक दुकानात कामगार |

गावातील इलेक्ट्रीक दुकानात कामगार म्हणून ते काम करीत होते. त्या पगारावर ते घर चालवित होते. एवढ्या मर्यादित पगारावर घरखर्च चालत नव्हता. तेव्हा त्यांनी सहा महिन्याचे ॲटो रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण तालुक्यातील 'बालाजी मोटार ट्रेनिंग स्कूल' मधून घेतले. पण ॲटो रिक्षासाठी आवश्यक असलेले भांडवल त्यांच्याजवळ उपलब्ध नव्हते. तेव्हा महामंडळाच्या योजनेविषयीची माहिती गावातील व्यक्तीकडून मिळाली आणि त्यानुसार त्यांनी "ॲटो रिक्षा" या व्यवसायासाठी महामंडळाकडे कर्जासाठी अर्ज केला.

अंदाजे वर्षभराच्या कालावधीने गावातील बँकेकडून रु. ८७,२९६/- चा चेक मिळाला. त्यातून त्यांनी ॲटो रिक्षा घेतली. सध्या ती रिक्षा त्यांनी घुणकी ते हातकणंगले असे वडाप करण्यासाठी तसेच मागणीनुसार इतरत्रही वापरत आहेत. त्यामुळे त्यांतून त्यांना ब-यापैकी कमाई होत आहे. पण वडापच्या नियमाबाबतच्या अडचणी सध्या त्यांना जाणवत आहेत. ते म्हणतात की, महामंडळाच्या मदतीची रक्कम (२५ टक्के) ही

अत्यल्प आहे. वास्तविक महामंडळाच्या अल्प व्याजदराची मदत ही ५० टक्के किंवा ७५ टक्के रक्कमेची असावी. तर बँकेमार्फत मिळणारी मदत ही ५० टक्के किंवा २५ टक्के रक्कमेची अशी समसमान किंवा अल्प रक्कम ही बँकेमार्फत असावी. म्हणजेच महामंडळाकडून मिळणा-या योजनेचा लाभ लाभधारकांना ख-या अर्थाने मिळेल. आणि लाभधारकांच्या दृष्टीने ते अधिक सोयीचे व फायदेशीर ठरेल असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्रीमती रेखा आकाश जुवे |
| पत्ता | : | रा. हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३५ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | भाजी विक्री |
| एकूण रक्कम | : | रु. ४५,०००/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. ११,२५०/- |
| बँक कर्ज | : | रु. ३३,७५०/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | गृहिणी |

त्यांच्या पतीची मिळकत ही जेमतेम स्वरूपाची असल्याने तेवढ्यावरच घरखर्च भागविणे अवघड झाले होते. त्यामुळे त्यांनी महामंडळाकडे बीज भांडवल योजनेअंतर्गत "पानशॉप" या व्यवसायासाठी अर्ज दाखल केला. घरबसल्या काहीतरी मिळकत होईल म्हणून या व्यवसायाची त्यांनी निवड केली.

वर्षभराच्या कालावधीने त्यांना गावातील बँकेकडून रु. ४५,०००/- चा चेक मिळाला. त्यातून त्यांनी गावातच घराजवळील समोरच्या बाजूस "पानशॉप" चे दुकान चालू केले. यातून किमान मिळकत होत आहे. परंतु त्या म्हणतात की, महामंडळाकडून असो अथवा बँकेकडून असो त्यांना दोहोंकडून कर्जच मिळाले आहे. यामध्ये अनुदान नाही. वास्तविक अनुसूचित जाती प्रमाणे त्यांचीही जात भटकी, मागासलेली अशा या

लोकसमुदायाला अनुदानाची गरज आहे. परंतु ते मिळत नाही आणि महामंडळाकडून मिळणारी अल्प व्याजदाराची मदतही अल्प रक्कमेची आहे. महामंडळाची मदत भरीव स्वरूपाची नसून मदतीबाबत ह्या महामंडळाने आखडता हात घेतला आहे असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. दिलीप रामचंद्र कोवेकर |
| पत्ता | : | रा. हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३२ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | मेंढी पालन |
| एकूण रक्कम | : | रु. ३५,०००/- |
| महामंडळाचे २५ टक्के कर्ज | : | रु. ८,७५०/- |
| बँक कर्ज | : | रु. २६,२५०/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | खाजगी नोकरी |

खाजगी नोकरी, यामध्ये १२ तासाचे काम आणि त्यामानाने पगार हा अगदीच कमी असल्याने ती नोकरी परवडेनासी झाली. म्हणून महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्याचे निश्चित केले. "मेंढीपालन" या त्यांच्या परंपरागत व्यवसायातंर्गत कर्ज प्रकरण महामंडळाला सादर केले. महामंडळाकडून वर्षभराच्या कालावधीने कर्ज प्रकरण मंजूर होवून जवळच्या गावातील बँकेकडून रु. ३५,०००/- चा चेक मिळाला. त्यामुळे त्यांना त्यातून १० ते १२ मेंढ्या खरेदी करता आल्या. यामुळे सध्या त्यांना मेंढ्यांचे दूध, खत, लोकर यापासून उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे आर्थिक स्थितीत काही फरक पडला आहे. पण ते म्हणतात की, ह्या मेंढ्यातील एखाद्या मेंढीला आजार झाल्यास दुस-या मेंढ्यांनाही आजार होतो आणि त्यामुळे मेंढ्या दगावून आर्थिक फटका बसतो. त्यामुळे बँक कर्जाच्या परतफेडीसही वेळ होतो. आणि व्याज हे वाढत जाते. यासाठी महामंडळाने त्यांना करीत असलेल्या मदतीत आणखीन थोडी वाढ करावी आणि सरकारच्या प्राथमिक पशुवैद्यकीय आरोग्य केंद्रामार्फत जनावरांची मोफत तपासणीही

करावी. म्हणजेच लाभधारकांना दिलासा मिळेल आणि आर्थिकदृष्ट्या ते अधिक फायदेशीर ठरेल.

### ३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. किशन शिवा साठे | फकिरा शिवा साठे |
| पत्ता | : | रा. हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | |
| वय | : | अंदाजे ३५ वर्षे | अंदाजे ३४ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | बीज भांडवल योजना | |
| लाभाचे स्वरूप | : | गाय पालन | म्हैस पालन |
| एकूण कर्ज | : | रु. २०,०००/- | रु. २०,०००/- |
| अनुदान रक्कम | : | रु. १०,०००/- | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- | रु. १०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | शेतमजुरी किंवा इतरत्र मजुरी | |

गावात किंवा अन्य कोठेही रोजगार असेल तेथे मजुरी करून दिवसाकाठी मिळणा-या रक्कमेवर घरखर्च चालवित असत. पण त्यातून भागत नसे. म्हणून मग महामंडळाकडे "गाय पालन" या व्यवसायासाठी लाभधारक किशन शिवा साठे यांनी अर्ज केला. वर्षभराच्या कालावधीत गावातील गणेश बँकेकडून रु. २०,०००/- चा चेक मिळाला. यामुळे त्यांनी 'जर्सी' गाय घेतली. ही गाय दुधाला चांगली असल्याने काही दूध डेअरीत घालता येऊ लागले. पण त्यांना म्हैशीच्या दूधाच्या दराप्रमाणे चांगला दर मिळेना म्हणून मग त्यांच्या भावाच्या नावे "म्हैस पालन" या व्यवसायासाठी अर्ज केला आणि त्यांनाही महामंडळाच्या योजनेचा लाभ मिळाला. त्यामुळे सध्या त्यांना दोन्ही जनावरापासून दूध मिळत असून ब-यापैकी मिळकत होत आहे. पण ते म्हणतात की, महामंडळाकडून मिळणारी मदत ही अपुरी वाटते. कारण व्यवसायासाठी आवश्यक जागा (गोठा), त्यासाठी आवश्यक खर्च (वैरण, पेंड, औषधे) इत्यादीवर अधिक रक्कम

खर्च होते. आणि त्यासाठी त्यांना इतरत्रही कर्ज काढून कर्जाचे ओझे सोसावे लागते. म्हणून महामंडळाने करीत असलेल्या मदतीत वाढ करावी.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | सौ. अलका आप्पासो माने |
| पत्ता | : | रा. हालोंडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३३ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | कापड विक्री |
| एकूण कर्ज | : | रु. २०,०००/- |
| अनुदान | : | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | गृहिणी व किरकोळ शिलाई |

गावातील अगदी किरकोळ स्वरूपाची शिलाई त्या करीत होत्या. शिलाईबरोबर त्याला अनुषंगिक असलेला "कापड विक्री" चा व्यवसाय करावा म्हणून मग जिल्हयातील महामंडळाकडे अर्ज केला.

महामंडळाकडून साधारणत: ८ ते १० महिन्याच्या कालावधीत ते कर्ज प्रकरण मंजूर होऊन जिल्हयातील बँक ऑफ इंडियामार्फत रु. २०,०००/- चा चेक मिळाला. त्यातून त्यांनी व्यवसायाला सुरुवात केली. त्यांचे गाव हे खेडेगाव असल्याने आणि जवळच शहर लागल्याने शिवाय गांधीनगर सारखे कापड विक्रीसाठी प्रसिध्द असे ठिकाण असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होत आहे. मालाची विक्री उधारीवर व जुजबी स्वरूपात होत आहे. त्यातून म्हणावे तसेच उत्पन्न मिळत नाही. तसेच मालाच्या विविधतेतही कमतरता असल्याने त्याचाही व्यवसायावर परिणाम होत आहे.

महामंडळ लाभधारकांना रोजगार उभारणीस करीत असलेल्या सहाय्याऐवजी महामंडळानेच स्वत: मोठ्या रक्कमेची गुंतवणूक करून शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी मोठमोठाले गारमेंट शॉप, जनता बझार, दूध संघ, यासारख्या अधिक मनुष्यबळाची आवश्यकता असलेले व्यवसाय उभा करावेत आणि भांडवल गुंतवून व्यवसाय करू न इच्छिणा-या पण गरजवंत लाभधारकांना महामंडळाने निर्मिलेल्या या व्यवसायात रोजगार उपलब्ध करून दयावा. म्हणजेच त्यांच्यासारख्या लाभधारकांना स्पर्धेच्या युगातील तसेच व्यवसायातील धोका हा पत्करावा लागणार नाही. शिवाय कर्जाचे ओझेही राहणार नाही तर मेहनतीने चार पैसे कमविता येतील आणि ते त्यांना अधिक किफायतशीर ठरेल असे त्या म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. बाबासाहेब सत्याप्पा कांबळे |
| पत्ता | : | रा. आळते, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३१ वर्षे |
| योजनेचे नांव : | : | अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | मोटार पाईप लाईन |
| एकूण कर्ज | : | रु. ४०,०००/- |
| अनुदान | : | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. ३०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | शेतीकाम |

घरची थोडीफार शेती असल्याने आहे त्यातच उत्पन्न काढण्याचा प्रयत्न ते करीत होते. पण जमीन तांबड्या मातीची, पाऊस वेळी अवेळी, जवळपासचा भाग औद्योगिक वसाहतीचा, या सा-याचा परिणाम म्हणजे कधी पीक हाताशी येई कधी नुकसान सहन करावे लागे. अलिकडील २.३ वर्षात तर केवळ नुकसान पदरात पडले. पीकासाठी घातलेले बी-बियाणे, खते, औषधे यांचाही खर्च निघेना. ऊस, हरभरा, गहू यासारखे पीक काढावे म्हटले तर त्यांना पाण्याचा तुटवडा भासत होता. आर्थिक ओढाताण करून विहीर काढली. पाणीही ब-यापैकी लागले. पण पाईपलाईन करावयाचे

म्हणजे पुन्हा कर्ज. अशावेळी जिल्हयातील महामंडळाकडे "पाईपलाईन" या व्यवसायाच्या कर्ज प्रकरणाची चौकशी केली आणि त्यांना दिलासा मिळाला.

काही दिवसांनी कागदपत्रांच्या पूर्ततेसह त्यांनी महामंडळाकडे अर्ज केला. त्यांचे कर्ज प्रकरण १० ते १२ महिन्यांच्या कालावधीत मंजूर होऊन स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रु. ४०,०००/- चा चेक मिळाला आणि त्यातून पाणी उपसण्यासाठी आवश्यक असलेले मोटार व फिनोलेक्स पाईप घेवून शेतात पाईपलाईन केले.

सध्या ते कमी शेतीतही महामंडळाच्या मदतीने ऊसाचे पीक काढत आहेत आणि ऊसाला दरही चांगला असल्याने कुटुंबाची जबाबदारी योग्यरित्या पार पाडण्यास मदत होत आहे. कमी शेतीतही समाधानी आहोत असे ते म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. संजय सिताराम कांबळे |
| पत्ता | : | रा. घोसरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३१ वर्षे |
| योजनेचे नांव | : | अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | केरसुणी व्यवसाय |
| एकूण कर्ज | : | रु. २०,०००/- |
| अनुदान | : | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | शेतमजुरी |

खेड्यात मजुरीशिवाय दुसरे कोणतेही काम करता येत नव्हते. दिवसाकाटी मजुरी करूनच उदरनिर्वाह चालवत असे. म्हणजेच मजुरी केली तरच त्यांच्या हातातोंडाची गाठभेट होत असे. हातावरचे पोट घेवून ते दिवस काढत होते. तेव्हा त्यांना महामंडळाविषयी माहिती मिळाली आणि परंपरागत चालत आलेलाच व्यवसाय करावा म्हणून "केरसुणी व्यवसाय" अंतर्गत महामंडळाकडें कर्जासाठी अर्ज केला.

त्यांना गावातील युनियन बॅंक ऑफ इंडियामार्फत रु. २०,०००/- चा चेक मिळाला. त्यातून त्यांनी काही सिंधीची झाडे विकत घेतली आणि त्यापासून त्यांनी केरसुण्या बनविल्या. पण ते म्हणतात सध्या केरसुण्या बनविण्यापेक्षा त्या खपविणे (बाजारपेठ मिळविणे) फार अवघड बनले आहे. गाव लहान असल्याने गावोगाव फिरून त्या केरसुण्या खपवाव्या लागत आहेत. त्यात प्रवास खर्च आणि ओझे घेवून फिरावे लागते. या अडचणीमुळे बॅंक कर्ज हप्ते वेळेवर भरता येत नाहीत. म्हणून महामंडळाने यावरही काहीतरी उपाय काढावा असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. अनिल आप्पासो घाटगे |
| पत्ता | : | रा. मिणचे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३० वर्षे |
| योजनेचे नांव | : | अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | कापड विक्री |
| एकूण कर्ज | : | रु. २०,०००/- |
| अनुदान | : | रु. १०,०००/- |
| बॅंक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | किरकोळ कामे, मजुरी |

गावातच किरकोळ स्वरूपाची कामे ते करीत होते. पण स्वतःचा स्वतंत्र असा उद्योग व्यवसाय नव्हता. शिवाय कमी शिक्षणामुळे चांगली नोकरी नव्हती. म्हणून मग महामंडळाची मदत घेतली. बॅंक ऑफ इंडियाच्या पेठवडगाव शाखेकडून त्यांना रु. २०,०००/- चा चेक मिळाला. इतक्या कमी रक्कमेत स्वतंत्र गाळा (भाड्याने) घेऊन कापड विक्री करणे शक्य नाही म्हणून मग घरीच कापड विक्री करीत आहेत. पण ते म्हणतात की, गाव लहान असल्याने विक्रीही फारशी होत नव्हती. म्हणून सध्या ते गावोगाव फिरून कापड विक्री करीत आहेत. पूर्ण दिवस घालवल्यासही फारशी विक्रीही होत नाही. तसेच इतरत्र कर्ज काढून गावात किंवा अन्य ठिकणी गाळे भाड्याने घेऊन कापड दुकान काढण्यासही धाडस होत नाही. कर्जाचे ओझे अजुनही आहे.

शिवाय घरखर्च यामुळे काही करण्यास मार्गच नाही. त्यासाठी ते म्हणतात की, महामंडळाने आम्हा लाभधारकांना व्याजाच्या रक्कमेत सूट दिल्यास किंवा व्यवसाय चालत नसल्याची पाहणी (खात्री) करून घेऊन हप्त्याबाबत सवलत दिल्यास आम्हा लाभधारकांना महामंडळाची आणखीन मदतच होईल.

**४. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ**

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. दिलीप पांडुरंग आवळे |
| पत्ता | : | रा. कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३७ वर्षे |
| योजनेचे नांव | : | अनुदान योजना |
| लाभाचे स्वरूप | : | लॉंड्री व्यवसाय |
| एकूण कर्ज | : | रु. २०,०००/- |
| अनुदान | : | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १०,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | किरकोळ कापड धुलाई, इस्त्री |

कापड धुलाई-इस्त्री ही कामे ते करीत होते. कामही चांगले मिळत होते. पण दिवसातील अधिकाधिक वेळ हा धुलाई-इस्त्री यातच जात होता. या व्यवसायात वाढ करण्यासाठी भांडवलाची गरज होती म्हणून मग महामंडळाच्या योजनेचा "लॉंड्री व्यवसाय" अंतर्गत लाभ घेतला.

यामुळे सध्या त्यांच्या व्यवसायाला गती मिळाली आहे. ते कपड्याची धुलाई मशीनद्वारे करतात. त्यामुळे कमी वेळेत, कमी कष्टात सध्या त्यांना व्यवसाय करता येतो आहे. शिवाय ते ड्रायक्लिनींगही करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नातही ब-यापैकी वाढ होत आहे. त्यामुळे ते म्हणतात की, महामंडळाच्या या योजना लाभधारकांना अत्यंत फायदेशीर व सोयीच्या आहेत. तर बेरोजगारांना स्वावलंबी बनविण्याचे हे चांगले माध्यम आहे असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्रीमती मीना शिवाजी आंबेकर |
| पत्ता | : | रा. जुने पारगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३३ वर्षे |
| योजनेचे नांव | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | किराणा दुकान |
| बँक कर्ज | : | रु. ७५,०००/- |
| महामंडळाचे २० टक्के अनुदान | : | रु. २०,०००/- |
| लाभधारकाचा सहभाग | : | रु. ५,०००/- |
| एकूण रक्कम | : | रु. १,००,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | गृहिणी |

सर्व कुटुंबाच्या जबाबदारीमुळे असहाय्य बनलेल्या शिवाय शेती किंवा अन्य कोणतेही मिळकतीचे साधन त्यांच्याजवळ नसल्याने निव्वळ तडतोड करीत दिवस घालवीत होत्या. म्हणून महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे त्यांनी निश्चित केले आणि "किराणा दुकान" अंतर्गत महामंडळाकडे अर्ज केला. त्यानुसार त्यांना गावातीलच बँक ऑफ इंडियाचा रु. ७५,०००/- चा चेक मिळाला. त्यांनी जवळच्याच अमृतनगर येथे स्वतंत्र गाळा भाड्याने घेऊन व्यवसायास सुरुवात केली. या व्यवसायातून ब-यापैकी उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे पूर्वीच्या स्थिती थोडीफार सुधारणा झाली आहे. ही निश्चितच जमेची बाजू आहे. पण त्या म्हणतात की, महामंडळाने लाभ उपलब्ध करुन दिला आहे पण अनुदानावाचून वंचित ठेवले आहे. शिवाय अनुसूचित जाती जमातीप्रमाणे त्यांच्या ह्या इतर मागासवर्गीय लोकसमुदायाला भरीव स्वरूपाची मदत देण्यास महामंडळाने पाऊल मागे घेतले आहे.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. ज्ञानदेव गोपाळ राऊत |
| पत्ता | : | रा. चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ४० वर्षे |
| योजनेचे नांव | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | सलून शॉप |
| एकूण रक्कम | : | रु. ५०,०००/- |
| महामंडळाचे २० टक्के बीज भांडवल | : | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. ३७,५००/- |
| लाभधारकाचा सहभाग | : | रु. २,५००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | सलून काम |

गावातच त्यांच्या जात परंपरेचा व्यवसाय करीत होते. त्यातून दिवसाकाठी ब-यापैकी मिळकत होत होती. पण सध्याच्या परिस्थितीचा विचार करता ग्राहकांच्यादृष्टीने आवश्यक असलेली आधुनिकता, देण्यात येणारी सेवा, विविधता इ. बाबीकरीता व्यवसायात अधिक गुंतवणूक करणे गरजेचे होते. म्हणून मग महामंडळाच्या योजनेचा लाभ घेतला.

त्याप्रमाणे त्यांना गावातील युनायटेड वेस्टर्न बँकेचा रु. ४७,५००/- चा चेक मिळाला. त्यामुळे त्यांनी दुकानात आधुनिक मॉडेलचे चेअर्स, व्यवसायाकरीता काही क्रीम्स, लोशनस् खरेदी केल्या. याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर झाला आहे असे ते म्हणतात. या व्यवसायातून ब-यापैकी नफा मिळत असल्याने घरच्याही गरजा पूर्ण करता येत आहेत. शिवाय हप्तेही वेळेवर भरता येत आहेत. त्यामुळे त्यांना या व्यवसायात समाधान वाटत आहे.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. बदाम राजाराम लोहार |
| पत्ता | : | रा. हालोंडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३० वर्षे |
| योजनेचे नांव | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरुप | : | गायी पालन |
| एकूण रक्कम | : | रु. १,००,०००/- |
| महामंडळाचे २० टक्के बीज भांडवल | : | रु. २०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. ७५,०००/- |
| लाभधारकाचा सहभाग | : | रु. ५,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | खाजगी नोकरी |

शिरोलीच्या औद्योगिक वसाहतीत ते नोकरी करत. त्यातून महिन्याकाठी २००० ते २५०० रुपये मिळत. त्यातून प्रवासखर्च, घरखर्च वगैरे भागत नसे. त्यामुळे सततची उसनवार ही ठरलेलीच असायची. अशा या परिस्थितीने वैतागुन त्यांनी मदतीसाठी महामंडळाकडे "गाय पालन" (डेअरी) या व्यवसायातंर्गत अर्ज दाखल केला.

महामंडळाच्या मदतीमुळे शिरोलीच्या बँक ऑफ इंडियाचा रु. ९५,०००/- चा चेक मिळाला. त्यामुळे त्यांनी गोठा बांधून घेतला व दोन गायी विकत घेतल्या. यामुळे सध्या त्यांना दररोज ८ ते १० लिटर दूध मिळते. यातून त्यांचा घरखर्च तर भागतोच शिवाय या व्यवसायात घरच्यांची मदत होत असल्याने ते पूर्वीची नोकरीही करीत आहेत. यामुळे त्यांच्या कमाईत चांगलाच फरक पडला आहे. पण ते म्हणतात की, महामंडळाने केवळ २० टक्के रक्कमेच्या सहभागापेक्षा ४५ टक्के रक्कमेचा सहभाग घेतला असता तर आम्ही लाभधारक या कर्जातून लवकर मुक्त होऊ शकलो असतो असे वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्रीमती कल्पना कृष्णात मिरजकर |
| पत्ता | : | रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ४४ वर्षे |
| योजनेचे नांव | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | किराणा दुकान |
| एकूण रक्कम | : | रु. ५०,०००/- |
| महामंडळाचे २० टक्के बीज भांडवल | : | रु. १०,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. ३७,५००/- |
| लाभधारकाचा सहभाग | : | रु. २,५००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | घरकाम |

दुर्दैवाने त्यांच्या वाट्याला वैधव्य आल्याने, शिक्षणधारी मुले असल्याने चरितार्थ चालविण्याकरीता काहीतरी करण्याशिवाय पर्याय नव्हता. म्हणून मग त्यांनी आपल्या किमान शिक्षणावर आधारीत "किराणा दुकान" या व्यवसायासाठी महामंडळाकडे अर्ज केला.

त्यानुसार त्यांना गावातील रत्नाकर बँकेचा रु. ४७,५००/- चा चेक मिळाला. त्यातून त्यांनी तालुक्याच्या ठिकाणी किराणा दुकान चालू केले. सध्या दुकानातून त्यांना अल्प मिळकत होते. यामुळे वेळेवर हप्ते भरता येत नाहीत. दुकानातील भांडवल गुंतवणूक प्रमाणात नफा होत नाही भांडवलावरील व्याज तर दिवसेंदिवस वाढत आहे. शिवाय उधारी अधिक असून वसुलीही होत नाही. अशी परिस्थिती व्यवसायाबाबत निर्माण झाली आहे. आणि प्रत्येक व्यवसायात अशा अडचणी येतात म्हणून त्या म्हणतात की, महामंडळाने त्यांना देत असलेल्या रक्कमेत अधिक (४५ टक्के) रक्कमेचे बीज भांडवल कर्ज देवून मदत दिली असतील तर ती अधिक फायद्याची ठरली असते असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. अशोक रघुनाथ सुतार |
| पत्ता | : | रा. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे २८ वर्षे |
| योजनेचे नांव | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | चांदीकाम |
| एकूण रक्कम | : | रु. ७५,०००/- |
| महामंडळाचे २० टक्के बीज भांडवल | : | रु. १५,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. ५६,२५०/- |
| लाभधारकाचा सहभाग | : | रु. ३,७५०/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | किरकोळ काम |

किरकोळ चांदीकाम करीत होते. त्यांचे गाव हे चांदीनगरी असल्याने एकमेकांच्या मदतीने ब-यापैकी मिळकत होती. पण यामध्ये वाढ होणे गरजेचे होते म्हणून मग जिल्हयातील या महामंडळाची मदत घेतली.

कागलच्या बँक ऑफ महाराष्ट्रचा रु. ७१,२५० चा चेक मिळाला. त्यामुळे त्यांना स्वत:चा स्वतंत्र असा चांदी व्यवसाय करता येत आहे. पण त्यांना वाटते की, चांदीकाम हा मोठ्या रक्कमेच्या गुंतवणुकीचा व्यवसाय आहे. यासाठी राष्ट्रीय स्तरावरील योजना ह्या अधिक किफायतशीर ठरल्या असत्या. पण त्यांच्या लाभाबाबतचा विलंब हा लाभधारकांना सहन करावा लागतो. काळाची पाऊले ओळखून सुरु करीत असलेला व्यवसाय हा लाभधारकांना वेळेवर सुरु करता यावा म्हणून महामंडळाने लाभधारकांना विनाविलंब राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाच्या योजनांचा लाभ उपलब्ध करून द्यावा असे त्यांना वाटते.

| | | |
|---|---|---|
| लाभधारकाचे नांव | : | श्री. आनंदा ज्ञानू माने |
| पत्ता | : | रा. लिंगनूर, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| वय | : | अंदाजे ३२ वर्षे |
| योजनेचे नांव | : | बीज भांडवल योजना |
| लाभाचे स्वरूप | : | सलून शॉप |
| एकूण रक्कम | : | रु. २०,०००/- |
| महामंडळाचे २० टक्के बीज भांडवल | : | रु. ४,०००/- |
| बँक कर्ज | : | रु. १५,०००/- |
| लाभधारकाचा सहभाग | : | रु. १,०००/- |
| पूर्वीचा व्यवसाय | : | सलून काम |

त्यांचा परंपरागत व्यवसाय ते करीत होते. परंतु तालुक्याच्या ठिकाणी दुकान, शिवाय त्यांच्या शॉपजवळच इतरांचे सलून शॉप या सा-याचा परिणाम म्हणून त्यांच्या व्यवसायाला जम नव्हता तर निदान महामंडळाची मदत घेऊन आहे त्याच व्यवसायात वृध्दी करावी म्हणून महामंडळाकडे अर्ज केला.

महामंडळाची मदतही मिळाली. त्यातून व्यवसायात भरही घातली. पण तीही अल्प स्वरूपात. कारण महामंडळाची मदत ही अत्यंत अल्प अशी आहे. महामंडळाची मदत ही केवळ रु. ४०००/- चीच झाली आहे. वास्तविक योजनेच्या लाभाकरीता त्यापैकी भरीव रक्कम ही खर्च झाली आहे. आणि रु. १५,०००/- बँक कर्ज म्हणून मिळाले आहे. यामध्ये महामंडळाने मदतीबाबत खूपच आखडता हात घेतला आहे असे वाटते.

| | | |
|---|---|---|
| सेवाभावी संस्थेचे नांव | : | युवा ग्रामीण विकास संस्था |
| पत्ता | : | मु. पो. गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर |
| विकास संस्थेची स्थापना | : | दि. ३०/०३/१९९३ |
| योजनेचे नांव | : | सुक्ष्म पतपुरवठा योजना |
| महामंडळामार्फत वाटप | : | रु. ५,००,०००/- |

जिल्हयातील गारगोटी येथे ही युवा ग्रामीण विकास संस्था कार्यरत आहे. ह्या संस्थेने अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

१. व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे.

२. महिलांची डेअरी योजना राबविणे.

३. बचतगटाचे जाळे तळागाळातील महिलांकरीता पोहचविणे.

४. वैद्यकीय तपासणी केंद्र उभारणे.

५. गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, शिष्यवृत्त्या इ. वाटप.

६. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना राबविणे.

७. शासकीय योजना राबविणे.

८. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंसहाय्यता गट (SHG) ची स्थापना करणे.

९. बचतगटाची स्थापना करून महिलांना स्वयंरोजगार उभारणीस सहाय्य करणे.

वरील समाज उपयोगी कामे ही युवा ग्रामीण विकास संस्था करण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि या प्रयत्नातंर्गत बचतगट अथवा स्वयंसहाय्यता गटातील लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस मदत म्हणून या संस्थेने आकुर्डे, मडिलगे, करीवडे या गावातील जनसेवा स्वयंसहाय्यता गट, शिवशंकर गट आणि हनुमान स्वयंसहाय्यता गट यातील २५ लाभधारकांना प्रत्येकी रु. २०,०००/- चे अर्थसहाय्य

हे महामंडळामार्फत निव्वळ ४ टक्के व्याजदराने उपलब्ध करून दिले आहे. आणि या लाभातूनच लाभधारकांनी पिठाची गिरणी, मिरची कांडप मशिन, शिलाई मशिन, कापड विक्री, जनावर (गाय, म्हैस) पालन आणि सुतारकाम इत्यादी व्यवसाय त्यांनी सुरु केले आहेत. या व्यवसायाच्या उत्पन्नातून हप्त्याने ते कर्जाची परतफेडही करीत आहेत.

त्यांच्या या संस्थेत ८१ स्वयंसहाय्यता गट असून एका गावात एक किंवा दोन स्वयंसहाय्यता गट आहेत. त्यामध्ये ८१८ सभासद आहेत. यामध्ये बहसंख्येने महिला सदस्य आहेत.

वर वर्णन केल्याप्रमाणे विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्हयातील अनेक लाभधारकांनी घेतला आणि आपल्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये काहीना समाधानकारक व्यवसाय वाटला तर काहींना याबाबत उणिवा जाणवल्या. विकासात्मक महामंडळानी विकासाची संधी उपलब्ध करून दिली. पण त्यासाठी आवश्यक असे वातावरण मात्र विकासात्मक महामंडळ निर्माण करू शकले नाही असेच म्हणावे लागेल.

विकासात्मक महामंडळाच्या योजनांचा लाभ उपलब्ध करून घेताना लाभधारकांना अनेक अडचणींनाही सामोरे जावे लागले. यामध्ये उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला मिळविण्यासाठीची अडचण विशेषत भटक्या समुदायाला अधिक जाणवली. हा समुदाय "आज इंध उद्या तिथं" तर शासनाच्या पन्नास वर्षे निवासाची अट जातीचा दाखला मिळवण्यास अडचणीची ठरली.

बँकांनी लाभधारकांची कर्ज प्रकरणे मागील प्रकरणात विशद केल्याप्रमाणे प्रलंबित ठेवल्यानेही लाभधारकांना अडचणी आल्या.

एकंदरीत लाभधारकांना लाभाबाबत विकासात्मक महामंडळाच्या कार्यालयीन अडचणीऐवजी इतर अडचणी ह्या अधिक जाणवल्या असे लाभधारकांचे मत विचारात घेतल्यास स्पष्ट झाले.



महामंडळाने कर्ज वितरीत केलेल्या लाभार्थी श्रीमती लिना [illegible], जि. कोल्हापूर यांचे ब्युटीपार्लर



महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या सहकार्याने उभारलेला व्यवसाय

## संदर्भ सूची

१. विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत, दि. ५/१/२००७ व दि. ९/१/२००७

२. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने दिलेली माहिती दि. १५/१/२००७

३. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाने दिलेली माहिती, दि. १५/१/२००७

४. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने दिलेली माहिती, दि. १५/१/२००७

५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली माहिती, दि. १८/१/२००७

६. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत मिळालेले लाभधारकांचे मनोगत

७. लाभधारकांच्या मुलाखती दि. १७/१२/२००६, दि. २०/१२/२००६, दि. २८/१२/२००६, दि. ३०/१२/२००६, दि. ४/१/२००७, दि. ९/१/२००७, दि. १३/१/२००७, दि. १९/१/२००७, दि. २३/१/२००७